# महाराष्ट्र शासन

क्र.मअसे/५८-बी/२०१५/ १४६८
दूरध्वनी: ०२२-२६६७७५५५
फॅक्स : ०२२-२६६६०२८७
Email : info@mahafireservice.gov.in
Website: www.mahafireservice.gov.in

*तात्काळ*

**अग्निशमन सल्लागार यांचे कार्यालय,**
महाराष्ट्र अग्निशमन सेवा अकादमी,
विद्यानगरी, हंस भुग्रा मार्ग,
सांताक्रूझ-पूर्व, मुंबई-४०० ०९८.
दिनांक : 02/06/2015

प्रति,
आयुक्त, सर्व महानगरपालिका,
मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, मुंबई.
व्यवस्थापकीय संचालक, सिडको, नवी मुंबई.
मुख्याधिकारी, सर्व नगर परिषदा/नगर पंचायती.

विषय : अग्निशमन सेवेतील अधिकारी/कर्मचा-यांना समूह वैयक्तिक अपघात विमापत्रकांतर्गत विमा संरक्षण देणेबाबत.
संदर्भ : विमा संचालनालयाचे पत्र क्र.प्रविनि-२१/२०१५/ अग्निशमन सल्लागार/५९/संकिर्ण, दि.१३.०५.२०१५

***महोदय,***

उपरोक्त विषयाबाबत उप विमा संचालक (प्र), विमा संचालनालय यांच्या वरील संदर्भांकित पत्राची प्रत सोबत जोडली आहे. स्वतःचा जीव धोक्यात घालून अग्निशमन व विमोचनाचे कार्य करताना प्रसंगी अग्निशमन अधिकारी/कर्मचारी यांच्या जिविताला धोका निर्माण असतो. त्यामुळे राज्यातील सर्व अग्निशमन अधिकारी/कर्मचारी यांना विमाछत्राचा लाभ मिळण्यासाठी सदर पत्रासोबत जोडलेल्या शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक एआएम-२१८३/सीआर-१७४/८३/एडीएम-५, दि.१६.०१.१९८४ अन्वये राज्यातील अग्निशमन सेवा पुरविणा-या सर्व महानगरपालिका/नगरपरिषदा/ नगर पंचायती/विशेष नियोजन प्राधिकरणे यांच्या अग्निशमन सेवेतील अग्निशमन अधिकारी/कर्मचा-यांना विमा वैयक्तिक अपघात विमा पत्रकाखाली उतरविणे आवश्यक आहे.

०२. तरी आपल्या अग्निशमन सेवेतील अग्निशमन अधिकारी/कर्मचारी यांचा विमा संचालनालय, महाराष्ट्र राज्य यांचेकडून विमा वैयक्तिक अपघात विमा पत्रकाखाली उतरविण्यात यावा व शासनाचे विमाधोरण यशस्वीपणे राबविण्यात यावे ही विनंती. याबाबत अधिक माहितीसाठी उप विमा संचालक (प्र), विमा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, गृहनिर्माण भवन (म्हाडा) २६४, पहिला मजला, कलानगरसमोर, वांद्रे-पूर्व, मुंबई-४०००५१ (कार्यालय दूरध्वनी क्र.०२२-२६५९०६९०/ २६५९०७४६) यांचेशी कृपया संपर्क साधावा.

आपला विश्वासू,

02/6/15

**(एम.वी.देशमुख)**
अग्निशमन सल्लागार,
महाराष्ट्र शासन.

सहपत्र : वरीलप्रमाणे.
प्रत : माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी सादर.
१. मा.सचिव-२, नगर विकास विभाग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई-४०००३२.
२. आयुक्त तथा संचालक, नगरपालिका प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई-४०००३०.
३. उप विमा संचालक (प्र), विमा संचालनालय, शासकीय विमा निधी, वांद्रे-पूर्व, मुंबई-४०००५१.
४. मुख्य/प्रभारी अग्निशमन अधिकारी, सर्व अग्निशमन सेवा.

GRAM : VIMANIDHI
doihodmah@rediffmail.com
DIRECTORATE OF INSURANCE
MAHARASHTRA STATE
Griha Nirman Bhavan
(MHADA)
264, First Floor
Opp. Kalanagar, Bandra (East)
Mumbai 400 051

सत्यमेव जयते

# शासकीय विमा निधी

महाराष्ट्र राज्य

(विमा अधिनियम, १९३८ नुसार नोंदणीकृत)

तार : विमा निधी
विमा संचालनालय
महाराष्ट्र राज्य
गृहनिर्माण भवन (म्हाडा)
२६४, पहिला मजला
कलानगरसमोर, वांद्रे (पूर्व)
मुंबई ४०० ०५१

माहितीचा अधिकार

दूरध्वनी : संचालक २६५९ १७ ८२/२६५९ २४ ६१ • कार्यालय : २६५९ ०६ ९०/२६५९ ०७ ४६ • फॅक्स नं. ०२२-२६५९ ०४ ०३/२६५९ २४ ६१
email – ~~asstdiradmn.doi@mgif.maharashtra.gov.in~~ &
jtomisc.doi@mgif.maharashtra.gov.in

प्राविनि-२१/२०१५/अग्निशमन सल्लागार/ ९९ /संकीर्ण 13 MAY 2015

Seen by: S I O S Action by

प्रति,
मा. अग्निशमन सल्लागार,
महाराष्ट्र शासन,
महाराष्ट्र अग्निशमन सेवा अकादमी,
विद्यानगरी, हंस भुग्रा मार्ग, सांताक्रुझ (पूर्व),
मुंबई – ४०० ०९८.

अग्निशमन सल्लागार यांचे कार्यालय,
आवक क्र. ६४१
दिनांक 27 MAY 2015
फाईल क्र.
आवक लिपिकाची सही

विषय- अग्निशमन सेवेतील अधिकारी/कर्मचा-यांना समुह वैयक्तिक अपघात विमापत्रकांर्तगत विमा संरक्षण देणेबाबत.

संदर्भ: महाराष्ट्र शासन, वित्त विभाग शासन निर्णय क्र. एआयएफ २१८३/सीआर-१७४/८३/एडीएम-५, दि. १६.०१.१९८४.

महोदय,

शासकीय विमा निधी ही महाराष्ट्र शासनाची 'स्वयंविमा' योजना असून वित्त विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणाखाली कार्यरत आहे. संदर्भ क्र. १ येथे नमूद करण्यात आलेल्या शासन निर्णयांन्वये शासनाच्या प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष नियंत्रणाखालील मालमत्तेचा विमा शासकीय विमा निधीकडे वित्तीय शिस्तीची बाब म्हणून उतरविणे बंधनकारक आहे. (सोबत प्रत सादर)

महाराष्ट्र राज्यातील ठाणे/कल्याण डोंबिवली महानगरपालिका, अंबरनाथ/बदलापूर-कुळगाव/खामगाव नगरपरिषद इ. कार्यालये संदर्भाधीन शासन निर्णयाचे अनुपालन करून अग्निशमन सेवेतील अधिकारी/कर्मचाऱ्यांचा समुह वैयक्तिक अपघात विमापत्रकांर्तगत विमा उतरवून विमाछत्राचा लाभ घेत आहेत. परंतु, राज्यातील बहुसंख्य महानगरपालिका, नगरपरिषदा ह्या त्यांच्या अग्निशमन अधिकारी/कर्मचाऱ्यांचा विमा शासकीय विमा निधीकडे उतरवित नाहीत, हे येथे नमूद करण्यात येत आहे.

संदर्भाधीन शासन निर्णयानुसार राज्यातील अग्निशमन सेवा पुरविणाऱ्या सर्व महानगरपालिका, नगरपरिषदा यांना त्यांच्यासेवेतील अग्निशमन अधिकारी/कर्मचाऱ्यांचा विमा वैयक्तिक अपघात विमा पत्रकाखाली उतरविण्याचे आदेश/परिपत्रक आपल्या स्तरावरून निर्गमित करण्यात यावेत व त्याची प्रत या कार्यालयास अग्रेषित करावी, ही विनंती.

शासनाचे विमाधोरण यशस्वीपणे राबविण्याकरिता आपल्या सहकार्याची अपेक्षा.

आपला विश्वासू,

(अ. र. इंदुलकर)
उप विमा संचालक (प्र),
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

सहपत्र- वरीलप्रमाणे.

### समुह वैयक्तिक अपघात विमापत्राखाली मिळणारे विमासंरक्षणाचा तपशील

| क्र. | अपंगत्वाचा प्रकार | नुकसान भरपाई |
|---|---|---|
| १. | अपघाती मृत्यु | १०० % |
| २. | दोन हात, पाय, दोन्ही डोळे किंवा एक हात, पाय व एक डोळा गमावल्यास | १०० % |
| ३. | एक हात किंवा पाय किंवा एक डोळा | ५०% |
| ४. | कायमस्वरुपी संपूर्ण अपंगत्व | १००% |
| ५. | कायमस्वरुपी अंशतः अपंगत्व | अपंगत्वानूसार १ ते ५०% |
| ६. | तात्पुरते संपूर्ण अपंगत्व | राशिभूत रकमेच्या १% प्रति आठवडा (रू.३,००० प्रति आठवडा महत्तम मर्यादा) (जास्तीत जास्त १००आठवड्यांसाठी) |
| ७. | वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती अतिरिक्त विमाहप्ता भरून विस्तारीत करण्यात येते. | प्रतिपूर्तीची रक्कम यापैकी कमी असलेली<br>· प्रत्यक्ष वैद्यकीय खर्च<br>· राशिभूत विमा जोखीमेच्या १०%<br>· देय विमादावा रकमेच्या ४०% |
| ८. | विमाहप्ता राशीभूत रक्कम रू. १ लाख (वैयक्तिक अपघात विमा प्रस्तावपत्र परिपूर्ण माहितीसह प्राप्त झाल्यावरच विमाहप्ता रकमेचे परिगणन शक्य आहे) | अंदाजित विमाहप्ता रक्कम रू. ३६४/- (सेवाकरासहित) |

शासनाच्या प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष नियंत्रणाखालील मालमत्तेच्या विम्याबाबत

महाराष्ट्र शासन
वित्त विभाग
शासन निर्णय क्रमांक एआयएफ-२१८३/सीआर-१७४/८३/एडीएम-५
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १६ जानेवारी १९८४.

<u>कृपया वाचावे:-</u> (१) शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक जेआयजेफ-१९७०/संकीर्ण/एकवीस, दिनांक ५ मे १९७०.

(२) शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक डिजेआय-११७३/१४/७३/अ-चार, दिनांक १७ जानेवारी १९७३.

<u>शासन निर्णय:-</u> शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक जेआयजेफ-१९७०/संकीर्ण/एकवीस, दिनांक ५ मे १९७० अन्वये सर्व शासकीय विभाग, निम-शासकीय विभाग, जिल्हा परिषदा व महापालिका, महामंडळे, सहकारी कारखाने इत्यादी ज्या संस्थामध्ये शासनाचे प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष नियंत्रण/हित-संबंध गुंतलेले आहेत. अशा सर्व संस्थाना त्यांच्या मालकीच्या मालमत्तेचा विमा शासकीय विमा निधी-कडे उतरवावा लागतो. इतर विमा कंपन्याकडे ते असा विमा उतरवू शकत नाहीत.

२. सामान्य विमा व्यवसाय (राष्ट्रीयीकरण) अधिनियम, १९७२ नुसार देशातील सर्वसाधारण विमा व्यवसायाचे राष्ट्रीयीकरण करण्यात आले आहे. विमा व्यवसायाचे राष्ट्रीयीकरण झाल्यापासून वर नमूद केलेल्या शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक जेआयजेफ-१९७०/संकीर्ण/एकवीस, दिनांक ५ मे १९७० ची अंमलबजावणी करण्याच्या बाबतीत काही कार्यालयाकडून शंका व्यक्त करण्यात आल्या आहेत. त्याबाबतीत शासनाकडून असे स्पष्टीकरण करण्यात येते की, सर्वसाधारण विमा व्यवसाय (राष्ट्रीयीकरण) अधिनियमाच्या कलम ३६(१)(अ) नुसार ज्या संस्थामध्ये भाग भांडवल, कर्ज व हमी इत्यादी स्वरूपात शासनाचे भरीव वित्तीय हितसंबंध गुंतलेले आहेत अशा संस्थांच्या मालमत्तेच्या बाबतीत राज्य शासकीय विमा निधीला सर्वसाधारण विमा व्यवसाय चालू ठेवण्याची परवानगी देण्यात आली आहे.

३. शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक जेआयजेफ-१९७०/संकीर्ण/एकवीस, दिनांक ५ मे १९७० मध्ये नमूद केलेल्या आदेशाचा ह्या शासन निर्णयाद्वारे पुन्हा पुनरुच्चार करण्यात येत आहे. वरील नमूद केलेल्या आदेशाची प्रत ह्या आदेशाच्या सोबत जोडली आहे. वरील आदेश शासनाच्या अधिपत्या-खालील सर्व सार्वजनीक महामंडळे, वित्तीय संस्था व सहकारी संस्था यांना लागू आहेत व ह्या आदेशाची अंमलबजावणी न करणे म्हणजे शासनाच्या महसूलाचे नुकसान करणे असे समजले जाईल व त्याबाबतीत शासनास योग्य ती कार्यवाही करणे आवश्यक होईल. तरी सर्व मंत्रालयीन विभागांना व त्यांच्या अधिपत्याखालील सर्व विभाग/व कार्यालय प्रमुखांना असे कळविण्यात येते की, त्यांनी त्यांच्या अधिपत्याखालील सर्व सरकारी, निम-सरकारी व इतर संस्थाकडून वरील आदेशाचे वित्तीय शिस्तीची बाब म्हणून काटेकोर पालन होईल अशी काळजी घ्यावी.

४. सर्व संबंधितांना असेही कळविण्यात येते की, विमा संचालक हे शासकीय विमा निधीचे प्रमुख अधिकारी असून हा विमा निधी मंत्रालयातील वित्त विभागाच्या अधिपत्याखाली काम करतो.

मालमत्तेच्या विमा विषयक व त्याखालील दायित्वाबाबतची छाननी करण्याची आवश्यकता भासल्यास ती विमा संचालक, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे करावी.

५. शासन असाही आदेश देत आहे की, शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक डिओआय-११७३/१४/७३/ए-४, दिनांक १७ जानेवारी १९७३ मधील परिच्छेद ३ मध्ये नमूद केल्याप्रमाणे याबाबतीतचा त्रैमासिक अहवाल यापुढे वित्त विभागास पाठवू नये.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

ए. ह. कुमावत,
उप सचिव,
महाराष्ट्र शासन, वित्त विभाग.

सहपत्र: शा.नि.क्र. एआयएफ १९७०/संकीर्ण/एकवीस, दिनांक ५ मे १९७० ची प्रत.

प्रत:-

(१) मंत्रालयाचे सर्व विभाग,
(२) मंत्रालयाच्या निरनिराळ्या विभागांच्या अधीन असलेल्या सर्व विभागांचे व कार्यालयाचे प्रमुख,
(३) महालेखापाल, महाराष्ट्र-१, मुंबई,
(४) महालेखापाल, महाराष्ट्र-२, नागपूर,
(५) वरिष्ठ उप महालेखापाल, लेखा परीक्षा, मुंबई,
(६) सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
(७) सर्व नगरपरिषदा व महानगरपालिका.